| | |
|---|---|
| **CNR No.:** MHND160003392026 | **दिवाणी किरकोळ अर्ज क्र.५७/२०२६**<br>ललीता रघुनाथ चव्हाण व इतर<br>विरुध्द<br>निरंक |

## निशाणी क्रमांक ०१ वरील आदेश

{दिनांक ०२ जुलै, २०२६}

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार क्र.१ ते ६ यांनी बॉम्बे रेग्युलेशन कायदा, १८२७ चे कलम ३ प्रमाणे **मयत रघुनाथ आनंदराव चव्हाण** यांचा वारस दाखला मिळणेकरिता दाखल केला आहे.

०२. अर्जदार यांचे असे कथन आहे की, अर्जदार क्र.१ ही **मयत रघुनाथ आनंदराव चव्हाण** यांची पत्नी आहे. अर्जदार क्र.२ व ३ हे मुले असून अर्जदार क्रं ४ ही आई व अर्जदार क्रं ५ व ६ या मुली आहेत. **मयत रघुनाथ आनंदराव चव्हाण** यांचे दि. ०१/११/२०२५ रोजी मौजे कंजारा बु. ता. हदगाव, जि. नांदेड येथे निधन झाले आहे.

०३. **मयत रघुनाथ आनंदराव चव्हाण** यांना वरीलप्रमाणे वारस असून त्यांच्या व्यतीरिक्त इतर कोणीही वारस नाहीत. त्यांच्या निधनानंतर अर्जदार क्र.१ ते ६ हे शासकिय व निमशासकिय योजनेच्या कामकाजाकरिता शासकिय कार्यालयात गेले असता, संबंधीत कार्यालयाकडुन अर्जदारांना मयत यांचे वारस असल्याबद्दलच्या प्रमाणपत्राची मागणी केल्याने त्यांनी सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला.

०४. अर्जदारांनी अर्जदार हेच **मयत रघुनाथ आनंदराव चव्हाण** यांचे वारस असल्याचे सिध्द करणेकरीता खालीलप्रमाणे कागदोपत्री पुरावा न्यायालयात दाखल केला आहेः

| अ.क्र. | कागदपत्रांचे वर्णन | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| १. | अर्जदार क्र.२ याच्या सरतपासाचे प्रतिज्ञापत्र. | नि.क्र.**२५** |
| २. | **"दैनिक दलितवाणी"** या वृत्तपत्रातील **दिनांक २९/०४/२०२६** रोजीची पेपर नोटीस. | नि.क्र.**२८** |
| ३. | **मयत रघुनाथ आनंदराव चव्हाण** यांचे मृत्यु प्रमाणपत्राची मुळ प्रत. | नि.क्र.**१३** |
| ४. | अर्जदार क्र.१ ते ६ यांच्या आधारकार्डांच्या पडताळणी केलेल्या प्रती. | नि.क्र.**१४ ते १९** |

**०५.** अर्जदारांतर्फे पुरावा संपल्याची पुरशीस **निशाणी क्र.२९** वर दाखल करण्यात आली. अर्जदारांच्या विधिज्ञांचा युक्तीवाद विस्तृतपणे ऐकण्यात आला.

**०६.** निशाणी क्र.०१ वरील दि.२५/०२/२०२६ रोजीच्या आदेशाद्वारे सर्व सामान्यांकडुन हरकत आक्षेप नोंदविण्याकरीता जाहीर प्रगटन **'दैनिक दलितवाणी"** या वृत्तपत्रात **दिनांक २९/०४/२०२६** रोजीच्या आवृत्तीमध्ये प्रसिध्द करण्यात आले. तसेच सदर हरकतीबाबतचे नोटीस व जाहीरप्रगटन हे संबंधित ग्रामपंचायत व न्यायालयाच्या नोटीस बोर्डावर डकवून बजावणी केली आहे. त्यामुळे सदर जाहीर प्रगटन या न्यायालयाच्या स्थळसिमेमध्ये कायदेशिररित्या प्रसिध्द करण्यात आले आहे. सदर जाहीर प्रगटनाच्या विहीत मुदतीत अर्जदार यांनी दाखल केलेल्या सदरच्या अर्जास कोणीही आक्षेप नोंदविला नाही. सबब प्रस्तुतचा अर्ज व त्याबाबतचा अर्जदाराने दाखल केलेला पुरावा विना आव्हानित राहिला.

**०७.** साक्षीदार याने त्याच्या पुराव्यात अर्जातील विषद कथनांचा हुबेहुब उहापोह केला व पुराव्यामध्ये मयताशी असलेले नातेसंबंध आणि वारस असल्याचा दर्जा प्रकर्षाने उदघृत केला आहे. साक्षीदार याच्या पुराव्यातील विधानांचे कोणत्याही

प्रकारे खंडण झालेले नाही. **मयत रघुनाथ आनंदराव चव्हाण** यांच्या मृत्युची सिध्दता **निशाणी क्र.१३** वरील **मृत्युप्रमाणपत्राद्वारे** होत आहे. अर्जदार क्र.१ ही **मयत रघुनाथ आनंदराव चव्हाण** यांची पत्नी आहे. अर्जदार क्र.२ व ३ हे मुले असून अर्जदार क्रं ४ ही आई व अर्जदार क्रं ५ व ६ या मुली आहेत. यावरुन **मयत रघुनाथ आनंदराव चव्हाण** यांना अर्जदारांव्यतिरिक्त कोणतेही वारस नाहीत हे स्पष्ट होत आहे. अर्जदारांचा अभिलेखावरील दाखल सर्व पुरावा विना आव्हानित राहिल्याने दाखल पुराव्यावर विश्वास न ठेवण्याचे कोणतेही संयुक्तिक कारण अभिलेखावर उपलब्ध नाही. जोपर्यंत अर्जदारांव्यतिरिक्त आणखी ईतर वारस आहेत ही बाब पुराव्यानिशी सिध्द होत नाही तोपर्यंत अर्जदार हे मयताचे वारसप्रमाणपत्र मिळणेस पात्र आहेत. उपरोक्त परिस्थितीनुसार व कायद्यातील तरतुदींची पाहणी करता अर्जदार हे **मयत रघुनाथ आनंदराव चव्हाण** यांचे वारस म्हणुन वारसा प्रमाणपत्र मिळणेस पात्र ठरलेले आहेत. त्यामुळे परिणामतः अर्जदार हे वारसा प्रमाणपत्र मिळणेकरिता पात्र ठरलेले आहेत. अशा परिस्थितीत वरील सर्व विवेचनांवरुन मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहेः

## आ दे श

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. अर्जदार क्र.**१) ललीता रघुनाथ चव्हाण, २) सुभाष रघुनाथ चव्हाण, ३) दयानंद रघुनाथ चव्हाण ४) जिजाबाई आनंदराव चव्हाण ५) लता प्रकाश सुर्यवंशी ६) संगीता गोविंद माने** हे **मयत रघुनाथ आनंदराव चव्हाण** यांचे औपचारिपणे ओळखले जाणारे वारस आहेत.

३. अर्जदार यांच्याकडुन नियमानुसार न्यायालयीन शुल्क भरुन त्यांना बॉम्बे रेग्युलेशन कायदा, १८२७ चे पुरवणी–ब मधील विहीत नमुन्यात वारसा प्रमाणपत्र देण्यात यावे.

**(आदेश खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)**

AMARJEET BHARATRAO JADHAV
Digitally signed by AMARJEET BHARATRAO JADHAV
Date: 2026.07.02 15:23:03 +0530

**(अमरजीत भारतराव जाधव)**
दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, हदगाव
ता. हदगाव, जि. नांदेड.

दिनांकः ०२.०७.२०२६
ठिकाणः हदगाव.

## प्रमाणपत्र

मी अधिकथन करतो की, संगणक प्रणालीमध्ये क्रमावली नक्कल करुन घातलेल्या न्यायनिर्णयामध्ये शब्दनाब्द हा मुळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नावः | – | अनिता एस.गोदाम |
| न्यायालयाचे नावः | – | दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, हदगाव, ता. हदगाव, जि. नांदेड. |
| न्यायनिर्णय/आदेशाचा दिनांकः | – | ०२/०७/२०२६ |
| न्यायनिर्णय/आदेशावर पिठासन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याचा दिनांकः | – | ०२/०७/२०२६ |
| न्यायनिर्णय/आदेश संगणक प्रणालीमध्ये अपलोड केल्याचा दिनांकः | – | ०२/०७/२०२६ |